# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in


**अधिसूचना**

क्रमांक : 10/एडीएम/पदविका/अधिसूचना/2015/ ३६६०

दिनांक : 5 JUL 2017

**विषयः- शैक्षणिक वर्ष 2017-18 करिता थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील रिक्त जागा अद्यावत करणेबाबत...**

**संदर्भ:- या संचालनालयाचे पत्र क्रमांक 10/एनजीपी/संस्था स्थलांतर/2017/3500 दि. 16.06.2017.**

शैक्षणिक वर्ष 2017-18 ची थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. संदर्भिय पत्राव्दारे थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रकियेसाठी संचालनालयास रिक्त जागांचा तपशिल सादर करण्यापुर्वी दि. 03.07.2017 पर्यंत विद्यार्थ्यांचे संस्था बदल / अभ्यासक्रम बदलाबाबतची कार्यवाही पुर्ण करावयाची होती. त्यानंतर थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. व्यावसायिक पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अभ्यासक्रम निहाय रिक्त जागांचा तपशिल संस्थेच्या लॉगीनमधुन ऑनलाईन पध्दतीने या संचालनालयास दि. 03.07.2017 रोजी 5.00 वाजेपर्यंत कळविण्यात आले होते.

तरी, आता सदर अधिसूचनेव्दारे कळविण्यात येते की, थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अभ्यासक्रम निहाय रिक्त जागांचा तपशिल खाली नमुद केल्यानुसार संस्थेच्या लॉगीनमधुन ऑनलाईन पध्दतीने या संचालनालयास दि. 03.07.2017 ऐवजी दि. 10.07.2017 रोजी 5.00 वाजेपर्यंत करण्यात यावे.

- रिक्त जागेची संख्या ही त्या अभ्यासक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमता वजा त्याच अभ्यासक्रमाच्या त्याच पाळीमध्ये मागील वर्षी झालेले प्रवेश (प्रथम वर्षात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थी पहिल्या वर्षात नापास झाल्यास किंवा प्रवेश रद्द केल्यानंतर रिक्त होणाऱ्या जागा थेट व्दितीय वर्षाच्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासकमाच्या रिक्त जागेमध्ये ग्राहय धरण्यात येऊ नये.)
- शैक्षणिक वर्ष 2016-17 मधील नियमित विद्यार्थ्यांचे त्याच संस्थेत शाखा / पाळी बदल किंवा विद्यार्थी संस्था बदलाने दुसऱ्या संस्थेत जात असल्यास त्याच्या संस्था बदलाने रिक्त झालेली जागा ग्राहय धरण्यात यावी.

**(चंद्रशेखर ओक )** भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**

1. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, बांद्रा (पुर्व), मुंबई
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
3. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई.
4. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनूदानित व विनाअनुदानित संस्था
5. प्राचार्य, सर्व सुविधा केंद्र व ए.आर.सी.
6. निवडनस्ती.

E:\letters\cap 2010-11\notification regarding cap 2017-18.doc